माहितीचा अधिकार प्राधान्य

कार्यालय ग्रा.पं.-----------------------------
ता.------------------- जि.------------------
दूरध्वनी------------------ ----- फॅक्स क्र. -------------------

ई-मेल-------------------------------

जा.क्र. ------ दिनांक : / /२०

**प्रति,**

श्री./सौ. ------------------------------------------------------------

पत्ता:------------------------------------------------------------

**विषय: माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती मिळणेसाठी केलेला एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधीत असणेबाबत.**

**संदर्भ: १) महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ नियम ३ क**

२) आपला अर्ज आ.क्र. --------------------------- दि. / /२० प्राप्त दि. / /२०

**महोदय,**

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपण माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत संदर्भ २ नुसार अर्ज सादर केलेला आहे. आपल्या अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, आपण एकाच अर्जामध्ये एकापेक्षा जास्त विषयाबद्दल माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ नियम ३ क मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे:

*"**३क : एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे**- अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दीडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील;*

*परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज करण्याचा सल्ला, अर्जदाराला देईल."*

करिता आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, आपण सादर केलेल्या अर्जातील पहिल्या विषयाशी संबधित माहिती देण्यासाठीची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात येईल. अर्जातील इतर विषयाची माहिती आपणांस हवी असल्यास प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रा.वि.अ**

ग्रामपंचायत.-------------------------------

**प्रतिलीपी:**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ----------------------------------- पं.स.----------------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.